August-2023

# कुंडलचा स्वातंत्र्यदिन विविध उपक्रमाने

वार्ताहर
कुंडल

कुंडलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्य कार्यक्रम ग्रामपंचायत कार्यालयासमोर पार पडला प्रशासक डी. सी. खाडे यांचे हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी आ. अरुण लाड, रयत चे उपाध्यक्ष महेंद्र लाड, किरण लाड, मामासाहेब पवार बँकेचे चेअरमन बाळासाहेब पवार, श्रीकांत लाड, कुंडलिक एडके आदीसह मान्यवर उपस्थित होते.

क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड कारखान्यावर डॉ. आशा पाटील यांचे हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी आ.अरुण लाड, चेअरमन शरद लाड, जिल्हा बँकेचे माजी संचालक किरण लाड, व्हा.चेअरमन दिगंबर पाटील , कार्यकारी संचालक चंद्रकांत गव्हाणे यांचेसह संचालक उपस्थित होते.

आ. लाड म्हणाले, कुंडल परिसर हा स्वातंत्र्याचे ज्वलंत ठिकाण आहे याच भूमीत स्वातंत्र्यासाठी अनेकांनी बलिदान दिले त्यामुळे ही भूमी पवित्र आहे.



**कुंडल : कुंडलमधील एकमेव हयात असलेले स्वातंत्र्यसैनिक विरुपाक्ष लुपणे यांचा सत्कार करताना प्राचार्य आर.एस. डुबल यावेळी उपस्थित प्रा. विश्वास सावंत, प्रा. सुभाष चवरे, प्रा. नवनाथ गुंड आदी.**

क्रांतिअग्रणी डॉ. जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये कुंडलमधील एकमेव हयात असलेले स्वातंत्र्य सैनिक विरुपाक्ष लुपणे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात येऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्राचार्य आर. एस. डुबल, जेष्ठ प्रा. प्रताप लाड, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

प्रतिनिधी विद्यासंकूलामध्ये गांधी एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार गोविंदराव डुबल यांच्या हस्ते ध्वावजारोहण करणेत आले. यावेळी मुख्याध्यापक चंद्रकांत जाधव यांचेसह सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

रणसंग्राम सोशल फौंडेशन च्या वतीने कुंडल येथे गेली पन्नास वर्षाहुन अधिक काळ शेतमजुरीच्या निमित्ताने वास्तव्यास असणाऱ्या लमाण समाजातील महिलांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी दिपक लाड व कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ.पतंगराव कदम विद्यासंकुलात पार्वती लाड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष मोहन बापू लाड यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. याप्रसंगी मुख्याध्यापिका कु. कांचन बाबर, मुख्याध्यापक अनिल लाड यांचे सह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते

याबरोबरच मामासाहेब पवार सत्यविजय सह.बँक, पलूस सह. बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, ॲकेडमिक हाईटस स्कूल, क्रांती इंटरनॅशनल स्कूल, कुंडल विकास सोसायटी, डॉ. पतंगराव कदम सह. सोसायटी, सत्यविजय सह. सोसायटी, गुरुकृपा पतसंस्था, समाजसेवा, किसान नागरी पतसंस्था, जनसेवा पतसंस्था, समाजसेवा पतसंस्था, आदीसह संस्थांमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा करणेत आला.

दै. तरुण भारत संवाद -- १७/०८/२०२३



**कुंडल :** येथील क्रांतिअग्रणी महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभप्रसंगी बोलताना प्रा. प्रताप लाड. यावेळी उपस्थित प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल व आदी. दै. सकाळ 19/08/2023

# क्रांतिअग्रणी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत

कुंडल, ता. १८ : येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत व भित्तिपत्रिका अनारण झाले. भित्तिपत्रिकेचे अनावरण प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांच्या हस्ते व प्रा. डॉ. प्रताप लाड यांच्या उपस्थितीत झाले.

प्रतिर्षीप्रमाणे बी.ए., बी.कॉम, बी.सी.ए. व बी.एस्स सी भाग एक मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित केला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयातील माजी प्राचार्य डॉ. प्रताप लाड उपस्थित होते. यावेळी प्रा. नवनाथ गुंड, प्रा. विवेकानंद माने, प्रा. जगन्नाथ पाटील, प्रा. बाळकृष्ण वाघमारे, प्रा. मोहन सदामते, प्रा. प्रवीणकुमार लुपणे, प्रा. संतोष नलवडे, प्रा. वंदना लोंढे, प्रा. आदी उपस्थित होते.

# कुंडल परिसरात स्वातंत्र्यदिन साजरा

**कुंडल : पुढारी वृत्तसेवा**

कुंडल परिसरात ७७ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रशासक डी. सी. खाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आ. अरुणअण्णा लाड, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्र लाड, क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, मामासाहेब पवार बँकेचे अध्यक्ष बाळासाहेब पवार, श्रीकांत लाड, कुंडलिक एडके उपस्थित होते.

क्रांतिअग्रणी डॉ. जी.डी.बापू लाड महाविद्यालयात स्वातंत्र्यसैनिक विरुपाक्ष लुपणे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल, प्रा. डॉ. प्रताप लाड उपस्थित होते.



**कुंडल :** ७७ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त येथील क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये स्वातंत्र्य सैनिक विरुपाक्ष लुपणे यांचा सत्कार करताना प्राचार्य मेजर डॉ. आर.एस. डुबल. दै. पुढारी 19/08/2023

प्रतिनिधी विद्या संकुलामध्ये गांधी एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार गोविंदराव डुबल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक चंद्रकांत जाधव उपस्थित होते.

रणसंग्राम सोशल फौंडेशनच्या वतीने लमाण समाजातील वयोवृद्ध महिलांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ॲड. दीपक लाड उपस्थित होते.

डॉ.पतंगराव कदम विद्यासंकुलामध्ये पार्वती लाड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष मोहन लाड यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. याप्रसंगी मुख्याध्यापिका कांचन बाबर, मुख्याध्यापक अनिल लाड उपस्थित होते. याबरोबरच मामासाहेब पवार सत्यविजय बँक, बँक ॲकेडमिक हाईटस स्कूल, क्रांती इंटरनशनल स्कूल, कुंडल विकास सोसायटी, डॉ. पतंगराव कदम सोसायटी, सत्यविजय सोसायटी, गुरुकृपा पतसंस्था, समाजसेवा, किसान नागरी पतसंस्था, जनसेवा पतसंस्था, समाजसेवा पतसंस्था, फ्रेंडसर्कल पतसंस्था यांच्यासह सर्व सहकरी संस्थामध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत

**केसरी वृत्तसेवा**

कुंडल : येथील क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत व भित्तीपत्रीका उद्घाटन समारंभ संपन्न झाला, भित्तिपत्रीकेचे उद्घाटन प्राचार्य, मेजर डा. आर.एस. डुबल यांचे हस्ते व महाविद्यालयातील जेष्ठ प्राध्यापक डा. प्रताप लाड यांचे उपस्थितीमध्ये करण्यात आले



कुंडल : क्रांतिअग्रणी महाविद्यालयात मार्गदर्शन करताना डॉ, प्रताप लाड, यावेळी उपस्थित डॉ. आर.एस. डुबल, डॉ.नवनाथ गुंड.

महाविद्यालयामध्ये बी.ए., बी.काम, बी.सी.ए.व बी.एस्ससी भाग एक मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित केला होता यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ प्रा. व माजी प्राचार्य डॉ. प्रताप लाड उपस्थित होते. यावेळी प्रा.डॉ. नवनाथ गुंड, प्रा.डॉ.विवेकानंद माने, प्रा.डॉ. जगन्नाथ पाटील, प्रा.डा.बाळकृष्ण वाघमारे, प्रा.डा.मोहन सदामते, प्रा.डा. प्रविणकुमार लुपणे, प्रा.संतोष नलवडे, प्रा.डॉ.वंदना लोंढे, विद्यार्थी उपस्थित होते.

दै. केसरी दि 29/05/2023

# क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये एकदिवसीय कार्यशाळा



कुंडल येथील क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये एक दिवसीय कार्यशाळेत बोलताना डॉ.सौ.उर्मिला क्षीरसागर यावेळी उपस्थित प्राचार्य डॉ.आर.एस. डुबल यांचेसह इतर मान्यवर.

। ललकार वृत्त ।

कुंडल दि. २६ (वार्ताहर) – येथील क्रांतीअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालय कुंडल येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व इतिहास विभागातर्फे 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महिलांचे योगदान' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयाच्या इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ.सौ.उर्मिला क्षीरसागर तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ.आर.एस.डुबल होते.

महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ.व्ही.आर. माने यांनी या कार्यक्रमाचे स्वागत करून भारतीय स्वातंत्र्यलढ्यात [illegible] कार्य करणाऱ्या प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडातील अनेक स्त्रियांचा परिचय करून दिला. तर [illegible] उर्मिला क्षीरसागर यांनी [illegible] जिल्ह्यातील विविध क्रांतिकारक महिला यांची [illegible] माहिती देऊन कुंडल परिसरातील अनेक क्रांतिकारक महिलांची माहिती सांगितली. त्यामध्ये क्रांतीविरांगना विजयाताई लाड, इंदुताई पाटणकर, लक्ष्मीबाई नायकवडी, हौसाताई पाटील, राजमती बिरनाळे यांच्या क्रांतिकारी कार्याची माहिती दिली.

सूत्रसंचालन प्रा.डॉ. सौ.व्ही. आर लोंढे यांनी केले तर आभार प्रा.शिवाजी यमगर यांनी मानले. यावेळी जेष्ठ प्रा.डॉ.प्रताप लाड, डॉ.जगन्नाथ पाटील, डॉ.धनंजय होनमाने, डॉ.झाकिरहुसेन सदे, डॉ.नवनाथ गुंड, डॉ.सुभाष पवार, डॉ.दत्तात्रय खडतकर, प्रा.विश्वास सावंत, प्रा. किशोर देसाई, आर.जी.जंगम आदीसह विद्यार्थी उपस्थित होते.

दै. सकाळ 31/8/23



कुंडल : कार्यशाळेत बोलताना डॉ. ऊर्मिला क्षीरसागर. या वेळी प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल आदी.

## क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयात कार्यशाळेस प्रतिसाद

कुंडल : येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व इतिहास विभागातर्फे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महिलांचे योगदान विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल अध्यक्षस्थानी होते. सांगलीच्या मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयाच्या इतिहासविभागप्रमुख डॉ. ऊर्मिला क्षीरसागर प्रमुख पाहुण्या होत्या. इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. व्ही. आर. माने यांनी स्वागत केले. डॉ. सौ. क्षीरसागर यांनी जिल्ह्यातील विविध क्रांतिकारक महिलांची माहिती देऊन कुंडल परिसरातील क्रांतिकारक महिलांची माहिती दिली. क्रांतिवीरांगना विजयाताई लाड, इंदूताई पाटणकर, लक्ष्मीबाई नायकवडी, हौसाताई पाटील, राजमती बिरनाळे यांच्या क्रांतिकारी कार्याची माहिती दिली. डॉ. सौ. व्ही. आर. लोंढे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. शिवाजी यमगर यांनी आभार मानले. डॉ. प्रताप लाड, डॉ. जगन्नाथ पाटील, डॉ. धनंजय होनमाने, डॉ. झाकिरहुसेन सदे, डॉ. नवनाथ गुंड, डॉ. सुभाष पवारे, डॉ. दत्तात्रय खडतकर, प्रा. विश्वास सावंत, प्रा. किशोर देसाई, आर. जी. जंगम यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

27/8/23



कुंडल : कार्यशाळेत बोलताना प्रा.डॉ. उर्मिला क्षीरसागर, सोबत यावेळी उपस्थित प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांचेसह इतर मान्यवर.

## क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये एकदिवसीय कार्यशाळा

कुंडल : येथील क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय कुंडल येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व इतिहास विभागातर्फे 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महिलांचे योगदान' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयाच्या इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ. उर्मिला क्षीरसागर तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल होते. महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. व्ही. आर. माने यांनी या कार्यक्रमाचे स्वागत करून भारतीय स्वातंत्र्यलढ्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडातील अनेक स्त्रियांचा परिचय करून दिला. तर डॉ. सौ. उर्मिला क्षीरसागर यांनी सांगली जिल्ह्यातील विविध क्रांतिकारक महिला यांची सविस्तर माहिती देऊन कुंडल परिसरातील अनेक क्रांतिकारक महिलांची माहिती सांगितली. त्यामध्ये क्रांतीविरांगना विजयाताई लाड, इंदुताई पाटणकर, लक्ष्मीबाई नायकवडी, हौसाताई पाटील, राजमती बिरनाळे यांच्या क्रांतिकारी कार्याची माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा.डॉ.सौ.व्ही.आर लोंढे यांनी केले तर आभार प्रा. शिवाजी यमगर यांनी मानले. यावेळी जेष्ठ प्रा. डॉ. प्रताप लाड, डॉ. जगन्नाथ पाटील, डॉ. धनंजय होनमाने, डॉ. झाकिरहुसेन सदे, डॉ. नवनाथ गुंड, डॉ. सुभाष पवारे, डॉ. दत्तात्रय खडतकर, प्रा. विश्वास सावंत, प्रा. किशोर देसाई, आर. जी. जंगम आदीसह विद्यार्थी उपस्थित होते.



# क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

। ललकार वृत्त ।

कुंडल दि. २१ (बार्ताहर) - येथील क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत व भित्तीपत्रीका उद्घाटन समारंभ संपन्न झाला.भित्तिपत्रीकचे उद्घाटन प्राचार्य,मेजर डॉ.आर.एस. डुबल यांचे हस्ते व महाविद्यालयातील जेष्ठ प्राध्यापक डॉ.प्रताप लाड यांचे उपस्थितीमध्ये करणेत आले.

महाविद्यालयामध्ये दरवर्षीप्रमाणे बी.ए.,बी.कॉम,बी.सी.ए.व बी.एस्ससी भाग एक मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित केला होता यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयातील जेष्ठ प्रा.व माजी प्राचार्य डॉ.प्रताप लाड हे उपस्थित होते. यावेळी डॉ.लाड यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जिवनाचा आनंद घेतानाच अभ्यासाकडेही लक्ष देऊन करीयर करणेविषयी मार्गदर्शन करतानाच महाविद्यालयाची स्थापनेपासून ते आजपर्यंतची वाटचाल कशी झाली हे विद्यार्थ्यपुढे मांडले.

तरुण भारत संवाद...२७/८/२३



कुंडल : कार्यशाळेत बोलताना प्रा.डॉ. उर्मिला क्षीरसागर, सोबत यावेळी उपस्थित प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांचेसह इतर मान्यवर.

# क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये एकदिवसीय कार्यशाळा

**कुंडल** : येथील क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय कुंडल येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व इतिहास विभागातर्फे 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महिलांचे योगदान' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयाच्या इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ. उर्मिला क्षीरसागर तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल होते. महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. व्ही. आर. माने यांनी या कार्यक्रमाचे स्वागत करून भारतीय स्वांतत्र्यलढ्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळातील अनेक स्त्रियांचा परीचय करून दिला. तर डॉ. सौ. उर्मिला क्षीरसागर यांनी सांगली जिल्ह्यातील विविध क्रांतिकारक महिला यांची सविस्तर माहिती देऊन कुंडल परिसरातील अनेक क्रांतिकारक महिलांची माहिती सांगितली. त्यामध्ये क्रांतीविरांगना विजयाताई लाड, इंदुताई पाटणकर, लक्ष्मीबाई नायकवडी, हौसाताई पाटील, राजमती बिरनाळे यांच्या क्रांतिकारी कार्याची माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा.डॉ.सौ.व्ही.आर.लोंढे यांनी केले तर आभार प्रा. शिवाजी यमगर यांनी मानले. यावेळी जेष्ठ प्रा. डॉ. प्रताप लाड, डॉ. जगन्नाथ पाटील, डॉ. धनंजय होनमाने, डॉ. झाकिरहुसेन संदे, डॉ. नवनाथ गुंड, डॉ. सुभाष खरे, डॉ. दत्तात्रय खळदकर, प्रा. विश्वास सावंत, प्रा. किशोर देसाई, आर. जी. जगम आदीसह विद्यार्थी उपस्थित होते.

# क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये ३१ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन



## शरद लाड

। ललकार वृत्त ।

कुंडल दि. [illegible] (वार्ताहर) - येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये गुरुवार दि.३१ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती या स्पर्धेचे मार्गदर्शक तथा क्रांती सह. साखर कारखान्याचे चेअरमन शरद (भाऊ) लाड यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. यावेळी गांधी एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार गोविंद डुबल, प्राचार्य मेजर डॉ. आर.एस. डुबल, जेष्ठ प्रा.डॉ.प्रताप लाड, या स्पर्धेचे समन्वयक प्रा.डॉ.धनंजय होनमाने, प्रा.ऋषिकेश [illegible], प्रा.कु. वैष्णवी जगम, प्रा.कु. भारती सुतार आदी उपस्थित होते.

शरद लाड यावेळी म्हणाले भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये साताऱ्याच्या प्रतिसरकार [illegible] चळवळीचे योगदान महत्वपूर्ण असून क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड हे प्रतिसरकारच्या तुफान सेनेचे फिल्डमार्शल होते. त्यांच्या नेतृत्वाखालील तुफान सेनेने इंग्रजांना सळो की पळो करून [illegible], सावकारी, व जमिनदारी [illegible] [illegible] स्वातंत्र्यानंतर ही शिक्षण, सहकार, कृषी व राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रासाठी आयुष्य खर्च केले, त्यांच्या विचारांचा क्रांतिज्योत वारसा घेऊन महाविद्यालयीन तरुणांच्या वैचारीक अभिव्यक्तीला एक समर्थ व निर्भिड व्यासपिठ मिळवून देण्यासाठी गेली सहा वर्षे क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करत आहोत.

जेष्ठ प्रा.डॉ.प्रताप लाड म्हणाले क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे हे सहावे वर्ष असून या स्पर्धेने गाठलेली उंची पाहता उत्तरोत्तर स्पर्धेचे स्वरुप व्यापक होत आहे. अन या यशाचे श्रेय स्पर्धेला बळ देणारे क्रांती चे चेअरमन शरद भाऊ यांचे आहे. ही स्पर्धा राज्याच्या काना कोपर्यात पोहोचली आहे.. यंदाची स्पर्धा ही त्याच ताकदीने होईल.

स्पर्धेविषयी बोलताना प्रा.डॉ.धनजय होनमाने म्हणाले ही स्पर्धा मराठी भाषेतुन असून यासाठी प्रथम क्रमांकासाठी रोख अकरा हजार रु. व सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र तर द्वितीय क्रमांकासाठी नऊ हजार रु. तृतीय क्रमांकासाठी सात हजार रु., चतुर्थ क्रमांकासाठी पाच हजार तसेच पाचव्या क्रमांकासाठी तिन हजार यासह उत्तेजनार्थ ही बक्षीस देणेत येणार आहेत. या स्पर्धेसाठी १) स्वातंत्र्य सैनिकांच्या अपेक्षा व स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव, २) प्रेम.. किती संकुचित, किती व्यापक ?, ३) धर्मांधता तरुणाईच्या प्रगल्भतेला व प्रगतीला मारक, ४) बाप, ५) संत नामदेव भारत जोडणारा दुवा, ६) फसवणूक मतदारांची की घटनेची ?,७) खरंच, बाईपण भारी देवा ?

हे विषय असून नोंदणी फी शंभर रु. आहे. या स्पर्धेसाठी ज्युनिअर ते पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. यासाठी नावनोंदणी ३० ऑगस्ट पर्यंत करता येईल. या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त स्पर्धकांनी भाग घ्यावा असे आवाहन यावेळी डॉ.होनमाने यांनी केले.

दै.तरुण भारत ३१/८/२३

# राज्यस्तरीय क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

## शरद लाड यांची माहिती : स्पर्धेचे सहावे वर्ष : स्पर्धेतून क्रांतिकारकांच्या विचारांची जोपासना

वार्ताहर

कुंडल

येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये गुरुवार, ३१ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती क्रांती सह. साखर कारखान्याचे चेअरमन शरद लाड यांनी दिली. यावेळी गोविंद डुबल, प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल, प्रा. डॉ. प्रताप लाड, प्रा. डॉ. धनंजय होनमाने, प्रा. ऋषिकेश खारगे, प्रा. वैष्णवी जगम, प्रा. भारती सुतार उपस्थित होते.

यावेळी शरद लाड म्हणाले, भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये साताऱ्याच्या प्रतिसरकारच्या चळवळीचे योगदान महत्त्वपूर्ण असून क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांनी स्वातंत्र्यानंतर शिक्षण, सहकार, कृषी व राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रासाठी योगदान दिले. त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन महाविद्यालयीन तरुणांसाठी 'क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे' आयोजन करत आहोत.



प्रा. डॉ. प्रताप लाड म्हणाले, वक्तृत्व स्पर्धेचे हे सहावे वर्ष असून या स्पर्धेने गाठलेली उंची पाहता उत्तरोत्तर स्पर्धेचे स्वरुप व्यापक होत आहे.

स्पर्धेविषयी बोलताना प्रा. डॉ. धनंजय होनमाने म्हणाले, ही स्पर्धा मराठी भाषेतुन असून यासाठी प्रथम क्रमांकासाठी रोख अकरा हजार रु. व सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र तर द्वितीय क्रमांकासाठी नऊ हजार रु., तृतीय क्रमांकासाठी सात हजार रु., चतुर्थ क्रमांकासाठी पाच हजार तसेच पाचव्या क्रमांकासाठी तीन हजार यासह उत्तेजनार्थ ही बक्षीस देण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी १) स्वातंत्र्य सैनिकांच्या अपेक्षा व स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव, २) प्रेम. किती संकुचित, किती व्यापक? ३) धर्मांधता: तरुणाईच्या प्रगल्भतेला व प्रगतीला मारक ४) बाप ५) संत नामदेव: भारत जोडणारा दुवा ६) फसवणूक मतदारांची की घटनेची ? ७) खरंच, बाईपण भारी देवा?

हे विषय असून नोंदणी फी शंभर रु. आहे. या स्पर्धेसाठी ज्युनिअर ते पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. यासाठी नावनोंदणी ३० ऑगस्ट पर्यंत करता येईल. या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त स्पर्धकांनी भाग घ्यावा असे आवाहन यावेळी होनमाने यांनी केले.

30/08/2023, 10:07 IMG-20230829-WA0012.jpg

पुण्य नगरी

# जी. डी. बापू लाड महाविद्यालयात गुरुवारी वक्तृत्व स्पर्धा

शरद लाड

कुंडल / वार्ताहर

येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयात गुरुवार दि. ३१ रोजी राज्यस्तरीय क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती स्पर्धेचे स्वागताध्यक्ष तथा क्रांती सह. साखर कारखान्याचे चेअरमन शरद लाड यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी गांधी एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार गोविंद डुबल, प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल,



प्रा. डॉ. प्रताप लाड, स्पर्धेचे समन्वयक डॉ. धनंजय होनमाने, प्रा. [illegible] खारगे, प्रा. कु. वैष्णवी जंगम, प्रा. कु. भारती सुतार आदी उपस्थित होते.

शरद लाड म्हणाले, भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात साताऱ्याच्या प्रतिसरकारच्या चळवळीचे योगदान महत्वपूर्ण असून क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड हे प्रतिसरकाच्या तुफान सेनेचे फिल्डमार्शल होते. त्यांच्या नेतृत्वाखालील तुफान सेनेने इंग्रजांना सळो की पळो करुन सावकारी, जमिनदारी समूळ नष्ट केली. स्वातंत्र्यानंतर शिक्षण, सहकार, कृषी, राजकीय, सामाजिक क्षेत्रासाठी आयुष्य खर्च केले. त्यांच्या विचारांचा कृतिशिल वारसा घेऊन महाविद्यालयीन तरुणांच्या वैचारीक अभिव्यक्तीला एक समर्थ व निर्भिड व्यासपीठ मिळवून देण्यासाठी गेली सहा वर्षे क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करत आहोत.

प्रा. प्रताप लाड म्हणाले, क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे हे सहावे वर्ष आहे. स्पर्धेचे स्वरुप व्यापक होत आहे. या यशाचे श्रेय क्रांतीचे चेअरमन शरद लाड यांचे आहे. प्रा. धनंजय होनमाने म्हणाले, ही स्पर्धा मराठी भाषेतून असून यासाठी प्रथम क्रमांकासाठी रोख ११ हजार रु. व सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय ९ हजार रु., तृतीय ७ हजार रु., चतुर्थ ५ हजार व पाचव्या क्रमांकासाठी ३ हजार रुपये आहे. उत्तेजनार्थ बक्षिसेही आहेत.

स्पर्धेसाठी स्वातंत्र्य सैनिकांच्या अपेक्षा व स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव, प्रेम.. किती संकुचित, किती व्यापक?, धर्मांधता : तरुणाईच्या प्रगल्भतेला व प्रगतीला मारक, बाप, संत नामदेव : भारत जोडणारा दुवा, फसवणूक मतदारांची की घटनेची?, खरंच, बाईपण भारी देवा? असे स्पर्धेचे विषय आहेत. नोंदणी फी शंभर रु. आहे. स्पर्धेसाठी ज्युनिअर ते पदव्युत्तर वर्गातीलच विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. नावनोंदणी ३० ऑगस्टपर्यंत करता येईल.

Smart Sangli Edition
Aug 26, 2023 Page No. 04
Powered by eReleGo.com

https://mail.google.com/mail/u/0/?tab=rm&ogbl#sent/QgrcJHrnzwdGqqRXPmRbQKkhJJRxJgLZxq?projector=1&messagePartId=0.1 1/2

दै. सकाळ 31/8/23

# कुंडलला आज क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धा

**▸ सकाळ वृत्तसेवा**

कुंडल, ता. ३० : येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयात उद्या (ता. ३१) राज्यस्तरीय क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती स्वागताध्यक्ष व क्रांती साखर कारखान्याचे अध्यक्ष शरद लाड यांनी दिली.

ते म्हणाले, स्वातंत्र्य लढ्यात प्रतिसरकार चळवळीत क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड तुफान सेनेचे फिल्ड मार्शल होते. इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. गुंडगिरी, सावकारी व जमीनदारी नष्ट केली. समताधिष्ठित व नैतिक मूल्यांच्या पायावर समाज उभारून राष्ट्रीय मूल्यांची वाढ व्हावी, यासाठी शिक्षण, सहकार, कृषी व राजकीय, तसेच सामाजिक क्षेत्रासाठी आयुष्य खर्च केले. त्यांचे विचार व कृतीचा वारसा घेऊन महाविद्यालयीन तरुणांच्या वैचारिक अभिव्यक्तीला एक समर्थ व निर्भीड व्यासपीठ मिळवून देण्यासाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले जाते.

डॉ. प्रताप लाड म्हणाले, सहावे वर्ष असून स्पर्धेचे स्वरूप उत्तरोत्तर व्यापक होत आहे. त्याचे श्रेय शरद लाड यांनाच आहे. स्पर्धा मराठीतून असून प्रथम क्रमांकासाठी ११ हजार व सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकासाठी ९ हजार, तृतीय क्रमांकासाठी ७ हजार रुपये, चतुर्थ क्रमांकासाठी ५ हजार, तसेच पाचव्या क्रमांकासाठी ३ हजार रुपये व उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात येणार आहे.

स्वातंत्र्य सैनिकांच्या अपेक्षा व स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव, प्रेम...किती संकुचित, किती व्यापक?, धर्मांधता: तरुणाईच्या प्रगल्भतेला व प्रगतीला मारक, बाप, संत नामदेव : भारत जोडणारा दुवा, फसवणूक मतदारांची की घटनेची?, खरंच, बाईपण भारी देवा असे विषय आहेत. ज्युनिअर ते पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी सहभागी होऊ शकतील.

प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल, संस्थेचे खजिनदार गोविंद डुबल, प्रा. डॉ. प्रताप लाड, समन्वयक प्रा. धनंजय होनमाने, प्रा. ऋषिकेश खारगे, प्रा. वैष्णवी जंगम, प्रा. भारती सुतार आदी उपस्थित होते.

# संतांची शिकवण दिशा देणारी : सोन्नर

दै. पुढारी 2/9/23

**कुंडल : पुढारी वृत्तसेवा**

संतांची शिकवण समाजाला दिशा देणारी आहे. त्याचे आचरण सर्व समाजाने करावे, तरच समाज योग्य दिशेने जाईल, असे मत शामसुंदर सोन्नर यांनी व्यक्त केले.

कुंडल (ता. पलूस) येथे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात आयोजित क्रांतीअग्रणी वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी आमदार अरुण लाड, क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड साखर कारखान्याचे अध्यक्ष शरद लाड, व्ही. वाय. पाटील उपस्थित होते.

सोन्नर म्हणाले, विचार सत्य भाषेत व मवाळ भाषेत मांडले पाहिजेत. वक्तृत्व ही कला आहे, त्याचा योग्य वापर करा.

आमदार लाड म्हणाले, वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड यांचे विचार चांदा ते बांदापर्यंत पोहोचवण्याचा वसा विद्यार्थ्यांनी घ्यावा.

स्वागताध्यक्ष शरद लाड म्हणाले, युवा व्याख्यात्यांच्या वक्तृत्वाला वाव मिळावा, तसेच क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांचे विचार सर्व दूर पोहोचावे, या उद्देशाने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे.

या उद्घाटन सोहळ्यास गांधी एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष चंद्रकांत रोकडे, 'क्रांती'चे संचालक बाळासाहेब विभुते, दिलीप थोरबोले, अनिल पवार, अशोक पवार, उमेश पेटकर, वैष्णवी जंगम, भारती सुतार उपस्थित होत्या.

प्रास्ताविक प्राचार्य मेजर आर. एस. डुबल यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा.डॉ. प्रताप लाड यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रा. गणेश खारगे यांनी केले. प्रा.डॉ. धनंजय होनमाने यांनी आभार मानले.




**कुंडल : येथे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना शामसुंदर सोन्नर. व्यासपीठावर आ. अरुण लाड, शरद लाड, व्ही. वाय. पाटील, प्राचार्य मेजर आर. एस. डुबल, प्रा. डॉ. प्रताप लाड.**